
विद्यापीठ अनुदान आयोगाने वैदिक फलज्योतिषाचा स्वतंत्र विभाग विद्यापीठांमध्ये सुरू करण्याचा आदेश काढला. त्यावर हे प्रतिगामी पाऊल ठरेल अशा आशयाचे एक पत्र प्रसिध्द खगोल शास्त्रज्ञ व पुणे येथील इंटरयुनिर्विसटी सेंटर फॉर अॅस्ट्रॉनॉमी व अॅस्ट्रोफिजिक्स (घ्ळ्ण) या संस्थेचे संचालक जयंत नारळीकर यांनी, आयोगाला पाठवले. त्यासंबंधात हर्ष काब्रा यांनी त्यांची घेतलेली ही मुलाखत. टाइम्स ऑफ इंडियामध्ये प्रसिध्द झाली आहे, तिचा हा अनुवाद...



# फलज्योतिष हे शास्त्र नाही!

## - जयंत नारळीक:



* विद्यापीठात वैदिक फलज्योतिषाचा स्वतंत्र विभाग उघडण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा प्रस्ताव तुम्हाला प्रतिगामी स्वरूपाचा का वाटतो?

-एखाद्या विषयाचे ज्योतिर्विज्ञान किंवा शास्त्र म्हणून चित्र उभे केले, तर तो विषय ज्या गृहीत कृत्यांवर उभा आहे, त्यांची विशिष्ट मांडणी शास्त्राच्या शिस्तबध्दतेनुसार केलेली आहे की, नाही याची तटस्थपणे पडताळणी आवश्यक आहे. फलादेशांसोबत ते अचूक आहेत, हे सिध्द करण्यासाठी चाचण्याही असणे जरूरीचे आहे. कुठल्याही शास्त्राची प्रगती याच मार्गाने झाली आहे. काही वेळा काही कल्पनांनी एक पातळी गाठल्यानंतरही आध-

सूक्ष्म निरीक्षणे त्यांच्या विरोधात आढळल्याने त्या कल्पनांचा त्याग करणेही भाग पडले आहे.

उदाहरणार्थ न्यूटनचे गुरुत्वाकर्षण खूपच यशस्वी ठरले होते, तरी आइन्स्टाईनच्या सापेक्षतावादाच्या सिध्दांतानुसार त्यात सुधारणा करावी लागली. विज्ञानाच्या सर्वच शाखांमधली ही परंपरा आहे. या पार्श्वभूमीवर ज्या वेळी तुम्ही ज्याच्या गृहीत कृत्यांची सुस्पष्टपणे व्याख्या केलेली नाही किंवा जी गृहीतके व्यक्तीव्यक्तीगणिक वेगवेगळी आहेत असा विषय सुरू करू इच्छिता त्यावेळी त्याचे फलादेश किंवा भविष्यकालीन अंदाज खूपच संदिग्ध असतात. सिध्द करून दाखवता येईल असा सिध्दांत असणे हे वैज्ञानिक पध्दतीच्या भविष्यकालीन अंदाजाचे वैशिष्ट्य असते. पण ज्योतिषाच्या फलादेशांना सिध्द करून दाखवणाऱ्या कोणत्याच नियंत्रित अशा चाचण्या अस्तित्वात नाहीत.

* परंतु फलज्योतिष हे गणिती कृत्यांवर व अक्षांश-रेखांशांवर आधारलेले आहे असे सांगण्यात येते. सुसज्ज प्रयोगशाळांच्या व्यतिरिक्तसुध्दा ज्योतिषी खगोलशास्त्रीय अंदाज अचूकपणे वर्तवीत आले आहेत.

- अक्षांश किंवा रेखांशांचे मापन किंवा ग्रहांच्या भ्रमणांची स्थिती म्हणजे फलज्योतिष नव्हे.

या ज्ञानाचा उपयोम ज्योतिषांनी करून घेतला असेल - जसे की, ग्रहणकालाचा अंदाज वर्तवण्यासाठी संगणक-तंत्रज्ञानाचा उपयोग करून ग्रहणांचा काल सांगणे हेसुध्दा एक विज्ञान आहे भ्रामक विज्ञान नव्हे. विज्ञानापासून तुमची फारकत त्या वेळी होते ज्यावेळी तुम्ही ग्रहणाचा मानवी जीवनावर ग्रहांचा परिणाम होतो असे भासवून त्यातून काही तरी भयप्रद निष्कर्ष काढू लागता. जोपर्यंत ज्योतिषात ग्रहांची दखल घेतली जाते तोपर्यंत सर्व ठीक असते पण एका विशिष्ट दिवशी जन्मल्यामुळे त्या व्यक्तीच्या जीवनावर परिणाम होतो असे ज्योतिष सांगते त्याला वैज्ञानिक दृष्ट्या काहीच आधार नाही.

* परंतु हे अंदाज, सर्व सजीव प्राणीमात्रांवर ग्रहांचा परिणाम होतो या गृहीतकावर आधारलेले आहेत. उदाहरणार्थ समुद्राला येणाऱ्या भरत्या व वर्तणुकीतील फेरबदल चंद्राच्या प्रभावामुळे होतात. हेच इतर ग्रहांनाही लागू नाही काय?

- प्रचंड विस्तार असलेल्या समुद्रात भरत्या-ओहोट्या होतात आणि गणिती प्रक्रिया करून आपण हे दाखवून देऊ शकतो की, त्यांचे कारण केवळ गुरुत्वाकर्षणाचा सिध्दांत हे आहे. पण या प्रभावाची सांगड तुम्ही मानवी शरीरातील रक्तप्रवाहाशी घालू लागला व वाढत्या रक्तप्रवाहामुळे मनुष्य अस्थिर होतो असा निष्कर्ष काढू लागला तर प्रश्न असा उरतो की, प्रत्येक जणच तसा का वागत नाही? हा प्रभाव अतिशय सूक्ष्म व लक्षणीय असतो हे गणिती मोजमापावरून दाखवून देता येईल. याचाही अनुभवांच्या आधारे पडताळा घेण्यात आला आहे व त्याला यत्किंचित आधार नसल्याचे सिध्द झाले आहे. पौर्णिमेला व अमावस्येला वेड्यांच्या इस्पितळातील किंवा खुनांच्या नोंदींची निरीक्षणे करून पाहिली गेली आहेत व अशा फेरबदलाच्या प्रस्तावाच्या दृष्टीने कोणताही संख्याशास्त्रीय पुरावा मिळालेला नाही. इतर ग्रहांच्या संदर्भात तर अशी उपपत्ती अधिकच दुर्बल ठरते.

* जर ते शास्त्र नसेल, तर मग ते आहे तरी काय?

- फलज्योतिष म्हणून जे म्हटले जाते ते पडताळा न घेतलेल्या गृहीतकांची एक मालिका आहे व ते माणसाच्या मानसिकतेचा व श्रध्दांचा एक अविभाज्य घटक बनले आहे. मी त्याच्याकडे एक भ्रामक विज्ञान म्हणूनच पाहतो.

* आपल्या दैनंदिन परंपरेची साऱ्या जगामध्ये ख्याती आहे आणि वेदकालीन युगातले आपले नैपुण्य आश्चर्यकारक रीत्या काळाच्या खूपच पुढे होते असाही सर्वमान्य निष्कर्ष आहे. अशा परिस्थितीत गर्ग, आर्यभट्ट, वराहमिहीर,

भटोत्पक्त किंवा महर्षि भृगु यासारख्या महनीय व्यक्तींचा किंवा त्यांनी वैदिक ज्योतिषात भर टाकलेल्या ज्ञानाचा तुम्ही अवमान करण्याचे कारण काय?

- खरेखुरे अस्सल ज्ञान कोणते आणि भ्रामक ज्ञान कोणते यामधील सीमारेषा आपण स्पष्टपणे आखून घ्यायला पाहिजे. एखाद्या युगात मान्यता पावलेले व आदरणीय ठरलेले ज्ञानसुध्दा आपल्या निसर्गाच्या ज्ञानानुसार विकसित होत असते व आधीच्या काही कल्पना, उपपत्ती यांचा आपल्याला त्याग करावा लागतो.

विज्ञान हे सतत स्वत:मध्ये सुधारणा घडवून आणीत असते. आयुर्वेदामध्ये परिणामकारक अशा अनेक उपचारांचा साठा आहे व वैद्य त्या उपचारांचा व्यवहारात वापरही करीत आहेत. परंतु त्या उपचारांचा परिणाम सिध्द झालेला असला तरी त्या उपायांचा शरीराबर नेमका काय परिणाम होतो याचा पध्दतशीर अभ्यास किंवा परीक्षण आपण केलेले नाही. हळदीचेच उदाहरण घ्या. तिच्या पेटंटच्या संबंधात हळदीचा उपयोग आम्हास पूर्वीपासून माहीत आहे याच मुद्यावर लढत देण्यात आली. अनुदान आयोगाला पाठवलेल्या पत्रात मी हेच सुचवले आहे की, आपल्या शक्ती वैदिक ज्योतिषावर वृथा खर्च करण्यापेक्षा ज्यांचा अभ्यास प्राधान्याने व अग्रक्रमाने करायला हवा अशी अनेक क्षेत्रे असंशोधित अवस्थेत आहेत याकडे प्रथम लक्ष द्यावे.

* बहुधा ज्योतिष आणि वास्तुशास्त्राचे अर्धवट ज्ञान असलेल्या ज्योतिष्यांमुळे त्याची विश्वसनीयता कमी झाली आहे. परंतु अलीकडे एका प्रख्यात ज्योतिष्याने आदल्या रात्री टेलिव्हिजनवर गुजरात भूकंपाबाबतचे भविष्य अचूक वर्तवले, मात्र शास्त्रज्ञांना असा अंदाज वर्तवता आला नाही.

- आपण हे प्रामाणिकपणे कबूल करायला हवे की, भूकंप किंवा पृथ्वीच्या पृष्ठभागाला धक्का पोचवणाऱ्या घटनांचे भविष्य वर्तवणे विज्ञानाला अजून अशक्यप्राय आहे. पण त्याचा अर्थ असा नव्हे की, ते संपूर्णतया रहस्यमय आहे किंवा त्याचा कधीच उलगडा होणार नाही. आपली त्यासाठी किंवा इतर घटनांच्या दृष्टीने पुरेशी तयारी झालेली नाही. आणि भविष्यवर्तवण्याबद्दल बोलायचे झाले तर एका अचूक अंदाजाला विज्ञानात फारसे महत्त्व नसते. तुम्हाला बरोबर अंदाजांची एक मालिका लागते, कोणते घटक बरोबर आहेत व ते कोणत्या अंदाजापाशी जुळतात हेही लक्षात घ्यावे लागते.

मला चांगले आठवते, १९९१ च्या सुरवातीस प्रभावी राजकारणी नेत्यांच्या बाबतीत काय घडेल याबद्दल ज्योतिष्यांना विचारण्यात आले होते. कुणीच राजीव गांधींच्या हत्त्येसंबंधी भविष्य वर्तवले नव्हते; ते तर सोडून द्या - पण त्यांच्या जिवाला धोका आहे असेही कोणी सुचवले नव्हते. ती घटना घडून गेल्यानंतर मात्र तशा विधानांचा किंवा अंशत: तशी विधाने शोधण्याचा प्रयत्न असा अंदाज वर्तवला गेला होता हे सिध्द करण्यासाठी झाला.